# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**रत्नागिरी जिल्ह्यातील प्राथमिक शाळांतील निमशिक्षकांना उपशिक्षक म्हणून सामावून घेण्याबाबत**

**(१) २३८६ (२२-१२-२०१४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील प्राथमिक शाळामधील निमशिक्षकांना उपशिक्षक म्हणून सामावून घेण्याचे आदेश देऊनही रत्नागिरी जिल्ह्यातील ८४ निमशिक्षकांना उपशिक्षक म्हणून अद्यापि सामावून घेतलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व उक्त निमशिक्षकांना उपशिक्षक म्हणून किती कालावधीत सामावून घेण्यात येईल,

(४) नसल्यास, होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापुर विद्यापीठाला राजमाता आहिल्यादेवी होळकर विद्यापीठ तर उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ नाव देण्याची केलेली मागणी**

**(२) १८२४८ (३०-०७-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापुर विद्यापीठाला राजमाता आहिल्यादेवी होळकर विद्यापीठ तर उत्तर महाराष्ट्र

विद्यापीठाला कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे नाव देण्याची दिनांक ७ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या सुमारास लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०७-२०१६) :** (१) होय.

(२) सोलापूर विद्यापीठाच्या नामविस्ताराबाबत “ही व्यवस्थापन परिषद सोलापूर विद्यापीठाच्या नावांत सद्य:स्थितीत कोणताही बदल करु नये असा ठराव करत आहे” असा ठराव विद्यापीठाच्या अधिसभेने मंजूर केला आहे.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या नामांतरणाबाबत विद्यापरिषेदेने ठराव क्र. वि.प. ०५/२०१३ अन्वये सुचित केल्याप्रमाणे समिती गठित केलेली आहे. सदर प्रकरणी चर्चा करुन धोरणात्मक निर्णय होण्याच्या दृष्टीने समितीची सभा आयोजित करण्याबाबत समिती सदस्यांनी सूचित केले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मेळघाट (जि.अमरावती) येथील आदिवासींच्या मुलांसाठी वसतीगृह योजना राबविण्याबाबत

**(३) २७०७९ (३१-०७-२०१५). श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) येथील आदिवासींच्या मुलांसाठी जिल्हा परिषदेच्या १० शाळांमध्ये वसतीगृह योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाखो रुपये खर्चुन सुध्दा आदिवासी वसतीगृहामध्ये कोणत्याच सुविधा उपलब्ध होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वसतीगृहाला मिळणारा निधी फक्त ५० टक्के मिळाला असून त्यातील विद्यार्थ्यांच्या वसतीगृहांवर खर्च होत नसल्याचे तसेच उक्त प्रकरणात शासकीय अधिकारी यांच्या संगनमताने गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त बाबतीत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०७-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हा येथील विभागीय क्रीडा उपसंचालक कार्यालयात अधिकृत क्रीडा उपसंचालक व लिपिकांची पदे रिक्त असलेबाबत**

**(४) २९०७८ (२०-०१-२०१६). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हा येथील विभागीय क्रीडा उपसंचालक कार्यालयात अधिकृत क्रीडा उपसंचालक व ५ लिपिकांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रभारी क्रीडा उपसंचालक व उपलब्ध कर्मचाऱ्यांवर कामाचा ताण येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास सदर रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१६) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

विभागीय उपसंचालक कार्यालय कोल्हापूर येथील लिपिकांची पदे रिक्त नाहीत. तथापि उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा, कोल्हापूर हे पद सद्य:स्थितीत रिक्त आहे. सदर पद भरण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पाठयपुस्तकांचा अभ्यासक्रमात बदल करण्याचे अधिकार रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीला देण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(५) २९९४७ (२१-०१-२०१६). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवीन अभ्यासक्रम व पाठयपुस्तकांबाबतचा अभ्यासक्रम व शिक्षणाची गुणवत्ता, जागतिक प्रवाह, परिणामे, शिक्षणाचा सैध्दांतिक हेतू व रचना यात बदल करण्याबाबतचे अधिकार रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीला देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण मंडळाकडून हे काम काढून घेण्याची कारणे काय आहेत तसेच कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, विचाराधीन प्रस्तावावर शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०७-२०१६) :** (१) नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील ग्रामीण व आदिवासी भागात उच्च शिक्षणाच्या प्रसारासाठी चांगल्या शैक्षणिक संस्थांची उपकेंद्रेसुरु करण्याबाबत

**(६) ३२२०१ (२३-१२-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गुणवत्ताधारी उच्च शिक्षणाच्या प्रसारासाठी चांगल्या शैक्षणिक संस्थांना ग्रामीण आणि आदिवासी भागांमधुन उपकेंद्रे सुरु करण्यासंबंधी विद्यापीठांच्या बृहतविकास आराखड्याविषयीचा डॉ.नरेंद्र जाधव समितीचा अहवाल शासनाकडे सादर केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवाल शासनाने स्विकारला आहे काय, अहवालामध्ये शिक्षण विकासाचे कोणकोणते ठळक मुद्दे आहेत, तसेच समितीच्या शिफारसीनुसार राज्यामध्ये कोणकोणत्या ठिकाणी नवीन उपकेंद्रे निर्माण होणार आहेत,

(३) असल्यास, सदर उपकेंद्रे पुर्णत: कार्यान्वित होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०७-२०१६) :** (१) व (२) विद्यापीठांनी सर्वसमावेशक बृहत आराखडे तयार करण्याबाबत मार्गदर्शक निकष ठरविण्यासाठी डॉ. नरेंद्र जाधव यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या समितीने दि. ०८/१०/२०१५ रोजी सादर केलेला अहवाल शासनाने दि. १४/१०/२०१५ रोजी स्विकारला आहे. सदर समितीने शिफारस केल्याप्रमाणे अकृषी विद्यापीठांचे सन २०१६-१७ साठीचे बृहत आराखडे अंतिम करण्यात आले आहेत. तसेच विद्यापीठ उपकेंद्रे निर्माण करण्यासंबंधाचे माजी प्र.कुलगुरु, डॉ. योगानंद काळे यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली असून समितीने दि. २३/०२/२०१६ रोजी आपला अहवाल शासनास सादर केला आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोकणातील हरिश्चंद्रगडाच्या कोकणकड्याची झालेली दुरवस्था

**(७) ३२२१६ (२१-१२-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील हरिश्चंद्रगडाच्या कोकणकड्यावर मोठमोठ्या भेगा पडत असल्याने पर्यटकांसाठी धोका निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत दोनदा कोकणकड्यावर रेलिंग लावण्यात आले आहे व त्यांची योग्य देखरेख केली नसल्याने कड्याचे सौंदर्य विद्रुप झाले, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच हरिश्चंद्रेश्वर या हेमाडपंथी मंदिरावर सोनकीची फुले उगवली आहेत हे सदर वास्तुरचनेसाठी अत्यंत धोकादायक आहे आणि त्याकडे पुरातत्व विभाग दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, हरिश्चंद्रगडाच्या कोकणकड्यांचा विकास शासन कधीपर्यंत करणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१६) :** (१) वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक यांनी कळविल्यानुसार हिरचंद्रगड कोकण कड्यावर ३० ते ४० वर्षापुर्वीपासून भेग आहे. सदर कोकण कड्यावर ठिकठिकाणी भेग पडत असल्यामुळे पर्यटकांना धोका निर्माण होईल असे निदर्शनास आलेले नाही.
(२) कोकण कड्यावर आतापर्यंत रॅलिंग लावण्यात आलेले नाही.
(३) हरिश्चंद्रेश्वर मंदिर हे राष्ट्रीय संरक्षित स्मारक असून ते भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय औरंगाबाद च्या अखत्यारीत येते. अधिक्षक पुरातत्वविद, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण मंडल कार्यालय, औरंगाबाद यांनी दिलेल्या माहितीनुसार मंदिरावर कुठल्याही प्रकारचे फुल उगवलेले नाही. तसेच सदर मंदिराच्या जतन व दुरुस्तची कार्यवाही आवश्यकतेनुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येते.
(४) महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्याचा जिल्हानिहाय पर्यटन बृहत विकास आराखडा तयार करण्याबाबत दिनांक ०४.११.२०१० चा शासन निर्णयानुसार मा. जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यानुसार अहमदनगर आराखडा महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळास प्राप्त झाला असून सदर आराखड्यात हरिचंद्रगड येथील विकास कामांचा समावेश करण्यात आला आहे. सदर प्रस्ताव छाननी अंती राज्य पर्यटन समितीसमोर अंतिम मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे. समितीच्या मान्यतेअंती कामाच्या प्राधान्यानुसार व निधीच्या उपलब्धतेनुसार जिल्हास्तरावरील यंत्रणेकडून कामांचे कार्यान्वित. हाती घेण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठातील बीएससी आयटीच्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट या विषयामध्ये मॉडरेटरने अनेक विद्यार्थ्यांना शुन्य गुण दिल्याबाबत

**(८) ३२७७६ (२३-१२-२०१५). श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई विद्यापीठातील बीएससी आयटीच्या प्रोजेक्ट मॅनेजमेंट या विषयामध्ये मॉडरेटरने अनेक विद्यार्थ्यांना शुन्य गुण दिल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या सप्ताहात वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०७-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) ३० ते ४० विद्यार्थ्यांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तपासले असता त्यांनी चुकीचा आसन क्रमांक टाकल्याने व काही विद्यार्थ्यांच्या प्रकरणांमध्ये स्कॅनरच्या तांत्रिक चुकांमुळे विद्यार्थ्यांना शुन्य गुण दर्शविण्यात आले होते. तथापि त्यांचे या विषयाच्या गुणपत्रिकेवरील नमूद गुण त्यांच्या निकालात समावेशित करुन सुधारित निकाल तीन दिवसाचे आत विद्यार्थ्यांना देण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेतील महाराष्ट्रातील पदकविजेता खेळाडूंना पुरस्काराची रक्कम इतर राज्यांपेक्षा कमी मिळत असल्याबाबत**

**(९) ३३३५५ (२२-१२-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केरळच्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धेत चमकदार कामगिरी करुन राज्याचा नावलौकीक वाढविणाऱ्या तब्बल १२३ पदकविजेत्या खेळांडूंची रोख रक्कम अद्याप देण्यात आली नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्रातील राष्ट्रीय क्रिडा स्पर्धातील पदकविजेतां खेळाडूंना पुरस्काराची रक्कम इतर राज्यांपेक्षा कमी मिळत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०४-०७-२०१६) :** (१), (२), (३) व (४) राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेतील राज्याचा नावलौकीक वाढविणाऱ्या खेळाडूंना द्यावयाच्या बक्षिसांची रक्कम निश्चित करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. इतर राज्यातील राष्ट्रीय स्पर्धेत पदक प्राप्त खेळांडूना मंजूर करण्यात येत असलेल्या पारितोषिकांच्या रकमांचा विचार करुन पारितोषिकांची सुधारित रक्कम शासन निर्णयात प्रस्तावित करण्यात आली आहे.

---

**उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील (जि.ठाणे) दशहरा मैदान,**
**उल्हासनगर-५ येथे तालुकास्तरीय क्रीडा संकुल उभारण्याबाबत**

**(१०) ३४७७५ (११-०१-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रातील (जि.ठाणे) दशहरा मैदान, उल्हासनगर-५ येथे तालुकास्तरीय क्रीडा संकुल उभारण्याबाबत दिनांक ०७ सप्टेंबर, २०१५ रोजी तालुका क्रीडा संकुल समितीच्या बैठकीमध्ये ठराव पारित करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर महानगर पालिकेने ना हरकत प्रमाणपत्र दिले आहे, हे हि खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचा भूखंड महाराष्ट्र शासनाच्या नावे असून हा भूखंड मुल्यरहित भोगाधिकार व सारामाफीने तालुका क्रीडा संकुल समिती, उल्हासनगर या नावे हस्तांतर करावा असा प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दि.९ ऑक्टोबर, २०१५ रोजी जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या कडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर भूखुंड तालुका क्रीडा संकुल समिती, उल्हासनगर याच्या नावे हस्तांतर करण्याबाबत आतापर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय वा सद्य:स्थिती काय ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१६) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

(४) मौ. उल्हासनगर दशहरी मैदान येथील जमीन तालुका क्रीडा संकुलासाठी मागणी केल्याच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी विहीत नमुन्यात प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे यांना सादर केला होता. सदर प्रस्तावामध्ये त्रुटी असल्याने त्रुटीचा पूर्तता करण्यासाठी प्रस्ताव उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांचेकडे पाठविण्यात आला आहे. त्रुटीची पुर्तता झाल्यानंतर जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडून प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य शासनाने सन २०१२ च्या शुल्क नियमन कायद्यांतर्गत**
**तयार केलेल्या नियमावलीबाबत**

**(११) ३४८६२ (२१-०१-२०१६). श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाने सन २०१२ च्या शुल्क नियमन कायद्यांतर्गत नियमावली तयार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नविन नियमांनुसार अनुदानप्राप्त शाळांनाही दरवर्षी १५ टक्के शुल्क वाढ करण्याची मुभा देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुळात या शाळांनी सर्वसामान्यांना शिक्षण दयावे यासाठी त्यांना शासन अनुदान देत असताना शुल्कवाढीची अनुमती देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, अनेक सवलत प्राप्त विद्यार्थ्यांच्या शुल्काची रक्कम शासन भरत असल्यामुळे शुल्कवाढ करण्याची परवानगी दिल्यास शासनाच्या खर्चात वाढ होवू शकेल हे लक्षात घेवून शासनाने या निर्णयाचा फेरविचार केला आहे वा करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.
महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) अधिनियम, २०११ मधील कलम २२(१) मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (शुल्क विनियमन) नियम, २०१६, तयार करण्यात आलेले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागभीड तालुक्यातील (जि.चंद्रपूर) वाढोणा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकानी शाळेतील शालेय पोषण आहारातील तांदूळ खुल्या बाजारात विकल्याबाबत

**(१२) ३५०५६ (२१-०१-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वाढोणा (ता.नागभीड, जि.चंद्रपूर) येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकानी शाळेतील शालेय पोषण आहारातील तांदूळ माहे मे, २०१५ च्या सुमारास खुल्या बाजारात विकला असून त्याची सखोल चौकशी करण्याची मागणी पालकांनी दिनांक २५ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या सुमारास वरिष्ठांकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले आहे,
(३) चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०७-२०१६) :** (१), (२) व (३) जिल्हा परिषद, चंद्रपूर चे माजी अध्यक्ष यांनी याबाबत तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी केली असता, सदर शाळेत शालेय पोषण आहार योजनेच्या तांदळाचा जादा साठा आढळून आला होता. यामुळे संबंधित मुख्याध्यापकाची एक वेतनवाढ कायमस्वरुपी रोखण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अहमदनगर जिल्हा परिषदेकडे योजनांची देखभाल व दुरुस्तीसाठी निधी मिळण्याबाबत**

**(१३) ३५६३३ (१४-०१-२०१६). श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात टंचाईच्या काळात ग्रामीण भागात टँकरने पाणीपुरवठा करावा लागातो. मात्र ऐन उन्हाळ्यात उद्भव कोरडे पडल्यास टँकर भरण्याचा प्रश्न निर्माण होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत जिल्हा परिषद ५ योजना चालविते मात्र सध्या जिल्हा परिषदेकडे योजनांची देखभाल व दुरुस्तीसाठी निधी नसल्यामुळे जिल्हा परिषदेने जिल्हा नियोजनाकडे निधीची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (२९-०६-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे.

श्रीगोंदा, अहमदगनगर, कर्जत आणि जामखेड तालुक्यात टँकर भरण्याचा प्रश्न निर्माण झाला होता.

(२) हे खरे आहे.

जिल्ह्यातील प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या देखभाल दुरुस्तीकरीता जिल्हा परिषदेकडे निधी नसल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अहमदनगर यांच्या दिनांक ११.०९.२०१५ च्या पत्रान्वये एकूण ६ प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या दुरस्तीकरिता जिल्हा नियोजन समितीकडे निधीची मागणी केली होती. त्यात जिल्हा परिषद चालवित असलेल्या ५ योजनांपैकी ३ योजनांचा समावेश आहे.

(३) मुख्य कार्यकारी अधिकारी, अहमदनगर यांच्याकडून प्राप्त प्रस्तावास जिल्हा नियोजन समितीकडून दिनांक ३०.०९.२०१५ च्या आदेशान्वये प्रादेशिक पाणी पुरवठा याेजनांच्या दुरुस्तीकरीता रु.२७२.४१ लक्ष इतक्या निधी मागणीच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यात जिल्हा परिषदेच्या ३ योजनांसाठी रु.२२५.८० लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे. त्यानुसार जिल्हा नियोजन समितीकडून प्राप्त निधीतून जिल्हा परिषदेने प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांच्या दुरुस्तीकरिता निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दुरुस्तीची कार्यवाही सुरु केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शासनाच्या मराठी भाषा विभागामार्फत भरविण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ज्ञानसंपदाची पुस्तके न ठेवल्याबाबत**

**(१४) ३९६९२ (०६-०५-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागामार्फत दिनांक ११ जानेवारी, २०१६ पासून आयोजित करण्यात आलेल्या मराठी भाषा विकास मंत्री यांनी उद्‌घाटन केलेल्या ग्रंथ प्रदर्शनात

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या, खुद्द राज्य शासनाने प्रसिध्द केलेले खंड, जीवनचरित्र व गाजलेल्या भाषणांची पुस्तके ठेवण्यात आली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(३) असल्यास, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची पुस्तके न ठेवल्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये तसेच आंबेडकरी जनतेमध्ये तीव्र असंतोष पसरलेला असून, शासनाने ठेवलेल्या ग्रंथ प्रदर्शनात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुस्तकांच्या लाभापासून अधिकारी व कर्मचाऱ्यांना वंचित ठेवण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०७-२०१६) :**(१) नाही.

दिनांक ११ ते १३ जानेवारी, २०१६ या कालावधीत मंत्रालय प्रागंणात आयोजित ग्रंथप्रदर्शनात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या व खुद्द राज्य शासनाने प्रसिध्द केलेले खंड, जीवनचरित्र व गाजलेल्या भाषणांची उपलब्ध प्रकाशने शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड यांचेमार्फत उपलब्ध करुन देण्यात आली होती. सदर कालावधीत सुमारे रु.१७,०००/- चा ग्रंथविक्री झाली.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई विद्यापीठात आपत्कालीन व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत

**(१५) ३९८५६ (०५-०५-२०१६). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दिनांक २६ जुलै, २००५ च्या महापुरानंतर आपत्कालीन व्यवस्थापन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी टाईम्स डिझॅस्टर मॅनेजमेंट आणि मुंबई विद्यापीठात सहकार्य करार होऊनही विद्यापीठाने आपत्कालीन व्यवस्थापन अभ्यासक्रम सुरु केला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आपत्कालीन व्यवस्थापन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी विद्यापीठाच्या अर्थसंकल्पात दरवर्षी तरतूद केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच मुंबईसारख्या जागतिक दर्जाच्या शहरातील विद्यापीठात असा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही. टाईम्स डिसॅस्टर मॅनेजमेंट व मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आपत्ती व्यवस्थापन अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला होता. त्यानुसार मुंबई विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २००६-२००७

मध्ये पदाविका स्तरावरील अभ्यासक्रम (Diploma in Disaster Management) सुरु करण्यात आला होता. मात्र टाईम्स डिझॅस्टर मॅनेजमेंट कक्ष समुहाने आर्थिक सहभाग न पुरविल्यामुळे पुढे हा अभ्यासक्रम बंद करण्यात आला.
(२) होय, हे खरे आहे.
(३) आपत्कालीन व्यवस्थापन विषयामध्ये अभ्यासक्रम सुरु करण्यासाठीची प्रक्रिया विद्यापीठ स्तरावर नव्याने सुरु करण्यात आली असून या शैक्षणिक वर्षापासून सदर विषयातील अभ्यासक्रम बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या आपत्कालीन व्यवस्थापन प्रशिक्षण प्राधिकरणाच्या सहकार्याने राबविण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**श्री गुरू गोविंदसिंग यांच्या नावाने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठात स्वतंत्र अध्यासन स्थापन करण्याबाबत**

**(१६) ३९८९९ (०५-०५-२०१६). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापिठात शीख समाजाचे दहावे गुरू श्री गुरू गोविंदसिंग यांच्या नावाने स्वतंत्र अध्यासन स्थापन करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री महोदयांनी माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान घुमान (पंजाब) येथे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विदयापिठात स्वतंत्र अध्यासन स्थापन करण्यात आले आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०७-२०१६) :** (१) होय.
(२) उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय क्र. एसआरटी-१११४/ अध्यासन/ प्र.क्र१०३/ विशि-२ दिनांक १५.०३.२०१६ अन्वये स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड येथे गुरु गोविंदसिंगजी अध्यासन सुरु करण्यासाठी रु. १.०० कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देऊन रु. २८.०० लक्ष अनुदान वितरीत करण्यात आले आहे. सन २०१६-१७ मध्ये उर्वरीत ७२.०० लक्ष निधी वितरीत करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य तंत्र शिक्षण संचालनालयाने १३१ अभियांत्रिकी महाविद्यालयांतील मागणी नसलेल्या अभ्यासक्रमांना बंद करण्याची केलेली शिफारस**

**(१७) ४०३२० (०५-०५-२०१६). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सन २०१२-१३ ते २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये ३५ टक्क्यापेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या जागा रिक्त आहेत त्याठिकाणी

शिक्षकांची पदेही भरण्यात आलेली नाही अशा १३१ अभियांत्रिकी महाविद्यालयांतील मागणी नसलेल्या अभ्यासक्रमांना बंद करण्याची शिफारस राज्याच्या तंत्रशिक्षण संचालनालयाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनास केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिफारशीच्या अनुषंगाने शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०७-२०१६) :** (१) होय.
(२) अभियांत्रिकी महाविद्यालयांना व नवीन अभ्यासक्रमांना मान्यता देण्याचे अधिकार अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना आहेत. त्यामुळे, अशा अभियांत्रिकी महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मुदत वाढ देताना विचार करावा असे परिषदेला कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदनाम व वेतनश्रेणीमधील बदलाबाबत**

**(१८) ४०४२२ (०५-०५-२०१६). श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २७ ऑगस्ट, २००९ च्या आकृतीबंधातील पदनाम तसेच वेतनश्रेण्या बदलण्यात आल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या बदलण्यासाठी अर्थ/वित्त विभाग तसेच मंत्रीमंडळाची मान्यता घेतली नव्हती, तसेच सदर विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेण्या बदलण्याचे प्रस्ताव वेतन त्रुटी निवारण समितीकडे पाठविले नव्हते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, वेतन त्रुटी निवारण समितीच्या शिफारशीप्रमाणे मंत्रीमंडळाची मान्यता घेऊनच वेतनश्रेणीमध्ये बदल करता येतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अन्य कोणकोणत्या विद्यापीठांच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदनाम आणि वेतनश्रेण्या बदलून दिल्या आहेत काय, तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदनाम आणि वेतनश्रेण्या बदलण्यासाठी प्रस्ताव पाठवण्याबाबतचे पत्र/परिपत्रक उच्च व तंत्र शिक्षण विभागाने विद्यापीठांना पाठविले होते काय,
(५) असल्यास, शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-०७-२०१६) :** (१) उच्चस्तरीय सचिव समितीने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने राज्यातील अकृषि विद्यापीठाच्या पदांच्या गटनिहाय (अ,ब,क,ड गटातील

पदसंख्येस) आढाव्यास दि. ०६ जुलै, २००९ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेली आहे. तथापि, त्यानुसार विद्यापीठांनी शासनास सादर केलेल्या पदनिहाय आकृतीबंधाच्या तसेच पदनाम बदलाच्या प्रस्तावांच्या अनुषंगाने दिलेल्या मान्यतेस वित्त विभाग/वेतन त्रुटी निवारण समितीची मान्यता घेतलेली नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली या विद्यापीठांनी काही पदनामांमध्ये सुधारणा करण्याबाबत सदर केलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने सदर विद्यापीठांतील पदनाम बदलांस मान्यता दिलेली आहे. मात्र याबाबतचे पत्र/परिपत्रक या विद्यापीांना पाठविण्यात आलेले नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**शालेय शिक्षण विभागाने शाळाबाह्य मुलांचे सदोष पद्धतीने सर्वेक्षण सुरूच ठेवल्याबाबत**

**(१९) ४०४५३ (२५-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), डॉ.राहूल आहेर (चांदवड), श्री.राज पुरोहित (कुलाबा), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाळाबाह्य मुलांकरिता नव्याने होणाऱ्या सर्वेक्षणातील त्रुटी दाखवून दिल्यानंतरही शालेय

शिक्षण विभागाने त्याची दखल न घेता सदोष पद्धतीने सर्वेक्षण सुरूच ठेवल्याने आता नाराज स्वयंसेवी संस्थांनी या मोहिमेतून माघार घेण्यास सुरुवात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पहिली मोहीम फसल्याने शाळाबाह्य मुलांकरिता दुसऱ्यांदा शोध मोहीम राबविण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या मोहिमेच्या आखणीत राहून गेलेले कच्चे दुवे दूर केल्याशिवाय हि मोहीम अर्थपूर्ण ठरणार नाही अशी भीती शिक्षण हक्क कार्यकर्त्यांकडून व स्वयंसेवी संस्थांकडून व्यक्त होत होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन शाळाबाह्य मुलांकरिता नव्याने होणाऱ्या सर्वेक्षण मोहिमेतील त्रुटी दूर करून शिक्षण हक्क संबंधित कार्यकर्ते व स्वयंसेवी संस्थांशी चर्चा करून मोहिमेचे धोरण ठरविणार का,

(५) असल्यास, त्रुटी दूर करून नवीन सर्वेक्षणास केंव्हा पासून सुरुवात करणार आहात, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) दिनांक ४ जुलै, २०१५ रोजी राज्यभर झालेल्या एका दिवसीय शाळाबाह्य मुलांचया सर्वेक्षणाचा आढावा मा.मंत्री (शा.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. या संदर्भात विविध अशासकीय संस्थांचे मत विचारात घेण्यात आले. त्यानुषंगाने शाळाबाह्य मुलांचे प्रमाण अधिक असलेले जिल्हे शोधून तेथे अशा मुलांचे सर्वेक्षण करण्यासाठी शिक्षण विभागातील अधिकारी, अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी, व राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक यांची समिती गठीत करण्यात आली. त्याप्रमाणे जिल्हास्तरावर नियोजन करुन सर्वेक्षणाचे स्वरुप अंतिम करण्यात आले. दि.२०/१२/२०१५ रोजी औरंगाबाद येथे राष्ट्रीयसेवा योजनेचे समन्वयक, अशासकीय संस्थाने प्रतिनिधी यांची मा.प्रधान सचिव (शा.शि.) यांच्या अध्यक्षतेखाली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत NSS विद्यार्थ्यांचे सहकार्य घेण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली त्यानुसार दि.१५ जानेवारी, २०१६ ते ३० जानेवारी, २०१६ या कालावधीत पुन्हा राज्यव्यापी सर्वेक्षण घेण्यात आले.

---

### राज्यात अवाजवी फी वाढ करणाऱ्या अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या व्यवस्थापनाविरुद्ध करावयाची कारवाई

**(२०) ४०५७९ (०५-०५-२०१६). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांची ढासळणारी स्थिती व सदरहू महाविद्यालयांना मोठ्या प्रमाणात फी वाढविण्यासाठी मिळणारी परवानगी यामुळे विद्यार्थी संघटना तसेच विद्यार्थी व पालकांमध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण झालेली नाराजी व शिक्षण शुल्क समितीबाबत शासनाकडे येणाऱ्या तक्रारी लक्षात घेऊन शिक्षण समिती शुल्क सचिव पदी राज्याच्या तंत्रशिक्षण संचालक यांची नियुक्ती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शिक्षण शुल्क समितीने आतापर्यंत किती तक्रारीचे निरसन केले आहे व मोठ्या प्रमाणात फी वाढ करणाऱ्या अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या व्यवस्थापनांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(३) नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

शुल्क नियामक प्राधिकरणाच्या सचिव पदी संचालक, तंत्र शिक्षण,महाराष्ट्र राज्य यांची नियुक्ती दिनांक १२ जानेवारी, २०१६ ते ११ मार्च, २०१६ या कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आली होती.
(२) शुल्क नियामक प्राधिकरणाकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने प्राधिकरणाच्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये मोठ्या प्रमाणात रिक्त असलेल्या जागा**

**(२१) ४०५९२ (०५-०५-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये गेली काही वर्षे मोठ्या प्रमाणात जागा रिक्त राहत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या दर्जाबाबतही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील तंत्रशिक्षणातील गरज, विद्यार्थी संख्या व शैक्षणिक सुधारणेची गरज यांचा कोणत्याही शास्त्रशुद्ध पद्धतीने विचार न करता अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद यांनी अभियांत्रिकी महाविद्यालय तसेच अभ्यासक्रम प्रवेश संख्येला मान्यता दिल्याने असे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भविष्यकाळात अशा अडचणी येऊ नयेत म्हणून शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत वा करीत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची काय कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०७-२०१६) :** (१) होय.
(२) व (३) अंशत: खरे आहे.
(४) राज्यातील अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांचा विचार करता नवीन अभ्यासक्रम यांना मान्यता देण्यात येऊ नये अशी विनंती अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई विदयापीठाअंतर्गत मेकॅनिकल इंजिनिअर अभ्यासक्रमाकरिता माहे मे, २०१५ मध्ये प्रथम वर्षातील विषयांच्या उत्तरपत्रिकांची तपासणी अचुकतेने न केल्याबाबत**

**(२२) ४१३५५ (०५-०५-२०१६). श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विदयापीठाअंतर्गत मेकॅनिकल इंजिनिअर अभ्यासक्रमाकरिता माहे मे, २०१५ मध्ये प्रथम वर्षातील उर्वरीत विषयांबाबत झालेल्या परिक्षेमधील विद्यार्थ्यांनी सहापैकी चार प्रश्न सोडवून देखील त्यातील काही प्रश्न न तपासता तेथील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना शून्य (०) मार्क दिल्याची बाब माहे जून, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित विद्यार्थ्यांनी दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास मुंबई विद्यापिठ, कालिना, मुंबई येथे लेखी निवेदन दिले असता त्यांना संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांकडून जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात आल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होऊ नये याकरिता शासनाने कोणती चौकशी केली वा करण्यात येत आहे,

(४) तदनुसार संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही. काही विद्यार्थ्यांनी केलेल्या तांत्रिक चुकांमुळे (उत्तरपुस्तिकेतील आसन क्रमांक चुकीचे लिहीणे,Q.P.Code चुकीचे लिहिणे इ.) सदर विद्यार्थ्यांच्या निकालपत्रात शुन्य गुण आलेले आहेत.

(२) हे खरे नाही. सदर विद्यार्थ्यांचे त्यासंबंधीचे अर्ज विद्यापीठात प्राप्त झाल्यानंतर आवश्यक प्रशासकीय बाबी पूर्ण करुन विद्यापीठाने संबंधित विद्यार्थ्यांचे सुधारित निकालपत्र तातडीने घोषित केले. मात्र याबाबत विद्यार्थ्यांच्या लेखी निवेदनाला अधिकारी/कर्मचा-यांकडून जाणीवपूर्वक टाळाटाळ करण्यात आली आहे.

(३) विद्यार्थी हित लक्षात घेऊन सुधारित निकाल तातडीने घोषित करण्यात आला व तद्नंतर त्यासंबंधीचा एकही विद्यार्थ्यांची बाब प्रलंबित नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड शालेय जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षणाधिकारी व गट शिक्षणाधिकारी पदांवर नियुक्ती करणेबाबत**

**(२३) ४१४३२ (२५-०५-२०१६). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हा परिषद अंतर्गत शिक्षणाधिकारी व गट शिक्षणाधिकारी ही पदे माहे जानेवारी २०१६ पर्यंत रिक्त असल्याने प्रभारी अधिकाऱ्यांची नियुक्ती करून कामकाज केले जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उपरोक्त रिक्त पदे भरण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०७-२०१६) :** (१) हे अंशतः खरे आहे. रायगड जिल्हा परिषदेमध्ये शिक्षणाधिकारी (माध्यमिक) हे पद तसेच गटशिक्षणाधिकारी संवर्गातील एकूण मंजूर १५ पदांपैकी ८ पदे रिक्त असून सदर पदांचा अतिरिक्त कार्यभार देऊन कामकाज केले जात आहे.
(२) रिक्त पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मावळ (जि.पुणे) तालुक्यातील नानोली येथे भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) स्थापन करण्याबाबत**

**(२४) ४१७२६ (०५-०५-२०१६). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मावळ (जि.पुणे) तालुक्यातील नानोली येथे भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था (आयआयटी) स्थापन करण्यासाठी शंभर एकर जागा देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, येत्या शैक्षणिक वर्षापासून हा अभ्यासक्रम सुरु होत असल्याने चाकण येथील सिद्धार्थ कॉलेजमध्ये तात्पुरते आयआयटीचे वर्ग भरविण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आयआयटीसाठी जागा संपादित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१६) :** (१) होय. मात्र त्यास आय. आय.टी. (IIT) असे संबोधण्यात येत असून आय.टी.आय.टी. (IIIT) असे संबोधण्यात येते.
(२) होय.
(३) होय.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मनमाड (ता.नांदगाव, जि.नाशिक) येथे क्रीडा संकुल होणेबाबत**

**(२५) ४१८०० (०६-०५-२०१६). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदगाव (जि.नाशिक) तालुक्यातील मनमाड शहरासाठी “ब” वर्ग नगरपरिषद व १ लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरात शासनामार्फत क्रीडा संकुल बांधण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनमाड येथे क्रीडा संकुल होणेबाबतची मागणी दिनांक २१ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखीपत्राद्वारे मा. क्रीडा मंत्री यांच्याकडे स्थानिक लोकप्रतिनिधी, नांदगांव यांनी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०७-२०१६) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) दिनांक २६ मार्च, २००३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार एका तालुक्याच्या ठिकाणी एक तालुका क्रीडा संकुल निर्माण होणे अपेक्षित आहे. त्यानुसार नांदगाव येथे नांदगाव तालुका क्रीडा संकुलास यापूर्वीच शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे. त्यामुळे सद्यःस्थितीत मनमाड या शहरासाठी क्रीडा संकुल उपलब्ध करणे शक्य होणार नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबतचा अहवाल

**(२६) ४२०७५ (१२-०५-२०१६). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाकडून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण तयार करण्यात येत असून याबाबतचे राज्य शासनाचे अभिप्राय असणारा अहवाल सादर करावा, असे केंद्र शासनाने राज्य शासनास कळविलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार राज्य शासनाने आपला अहवाल केंद्र शासनास सादर केला आहे काय, असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,
(३) अद्याप, अहवाल सादर केला नसल्यास याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१६) :** (१) होय.
(२) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबतचा अहवाल १४ मुद्यांवर आधारीत आहे. या प्रत्येक मुद्यांवर प्रश्न देण्यात आलेले आहेत. त्या प्रश्नांबाबत राज्य शासनाने द्यावयाच्या सूचना अभिप्राय असे अहवालाचे स्वरुप आहे. सदर अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात आलेला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खासगी तंत्रनिकेतन संस्थेमधील कर्मचाऱ्यांनी पुकारलेला बंद

**(२७) ४२४६३ (०५-०५-२०१६). श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील खासगी तंत्रनिकेतन संस्थेमधील कर्मचाऱ्यांनी २ दिवसांचा बंद पुकारला असल्याचे दिनांक २२ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंद पुकारण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदर कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांवर व परीक्षा तोंडावर असताना काम बंद केल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१६) :** (१) होय.

विवेकानंद पॉलीटेक्नीक, सितासावंगी, ता.तुमसर, जि.भंडारा या संस्थेतील काही कर्मचाऱ्यांनी दिनांक २७ जानेवारी २०१६ पासून लेखनीबंद आंदोलन केल्याची बाब निदर्शनास आली होती.

(२) विवेकानंद पॉलीटेक्नीक, सितासावंगी, ता.तुमसर, जि.भंडारा या संस्थेचे विद्यमान प्राचार्य व संस्थेतील काही कर्मचारी यांचे मध्ये आपसात असंतोषाची भावना असल्यामुळे सदरचे आंदोलन झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(३) सदर कालावधीत कोणतीही परीक्षा नसल्याचे त्याचा विद्यार्थ्यांवर कोणतीही परिणाम झालेला नाही.

सदर प्रकरणी तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांचे स्तरावर दिनांक २९ जानेवारी, २०१६ तात्काळ एक समिती गठीत करुन सदर प्रकरणाची दिनांक ३० जानेवारी, २०१६ रोजी चौकशी करण्यात आलेली आहे. चौकशी समितीच्या अहवालानुसार संस्थेमध्ये आढळून आलेल्या बाबींबाबत संस्थेला प्राचार्य, कर्मचारी व विद्यार्थी प्रतिनिधी यांना एकत्र बोलावून समस्यांचे निराकरण करण्यास, कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर आवश्यक कार्यवाही तात्काळ करणेबाबत व संस्थेतील वातावरण चागले राहील तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या निकषांची पूर्तता होईल अशी कार्यवाही तात्काळ करणेबाबत संस्थेला विभागीय कार्यालयामार्फत दिनांक २ फेब्रुवारी, २०१६ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. तसेच संस्थेने संबंधित प्राचार्य यांना पदमुक्त करण्याची कार्यवाही केलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाबळ (ता.शिरुर, जि.पुणे) येथील मस्तानिची कबर या**
**वास्तुची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत**

**(२८) ४२९०३ (२८-०४-२०१६). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाबळ (ता.शिरुर, जि.पुणे) या गावी मस्तानीची कबर व घडीची जागा आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मस्तानीची कबर या वास्तुला राज्यशासनाचा संरक्षित ऐतिहासिक वास्तुचा दर्जा देण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे जानेवारी, २००९ मध्ये वा त्यादरम्यान अज्ञात चोरट्यांनी मस्तानिची कबर उद्धवस्त करत खोदुन टाकली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर वास्तुची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१६) :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

दिनांक १७.०१.२००९ रोजी अज्ञान चोरट्यांकडून मस्तानी कबर खोदण्यात आली होती.

(४) सदर स्मारकाच्या जतन व दुरुस्तची कार्यवाही सन २०१३-१४ ते सन २०१५-१६ या कालावधीत पूर्ण करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील जिल्हा ग्रंथालयांना निधी मंजूर करण्याबाबत**

**(२९) ४३००७ (२६-०५-२०१६). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा ग्रंथालयांना गत चार महिन्यांपासून निधीच मंजूर न झाल्याने वीज आणि दूरध्वनी बिले थकलीअसुन जिल्हास्तरीय कार्यालये अंधारात असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित जिल्हा ग्रंथालयांना तात्काळ निधी वितरीत करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात यत आहे,

(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१६) :** (१) हे अंशत: खरे आहे.

माहे एप्रिल, २०१५ मध्ये शासनाकडून बीडीएसवर एकूण अर्थसंकल्पीय रकमेच्या ७०% निधीचे वाटप करण्यात आले होते. परंतू जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धुळे या कार्यालयाच्या बीडीएस प्रणालीवरील निधी काढण्यास विलंब झाला.

(२) शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१६ महाराष्ट्र विनियोजन विधेयक २०१५, निधी वितरण अन्वये अतिरिक्त २०% निधी बीडीएसवर उपलब्ध करुन दिल्यामुळे सदर ग्रंथालयास पुरेसा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विलेपार्ले येथील साठे आर्ट्स सायन्स व कॉमर्स महाविद्यालयातील प्राचार्य पदावर अपात्र व्यक्तीची केलेली नियुक्ती**

**(३०) ४३४६९ (०१-०६-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई),**

**श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या पार्ले टिळक विद्यालय असोसिएशनच्या विलेपार्ले येथील साठे आर्ट्स सायन्स व कॉमर्स महाविद्यालयात प्राचार्य पदावर अपात्र व्यक्तींची नियुक्ती करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नियुक्त व्यक्तीच्या एपीआय पॉईंटसची पुर्तता होत नसतानाही सदर निवड करण्यात आली नसल्यामुळे त्यासंबंधीच्या निवड समितीच्या इतिवृत्तावर शासन प्रातिनिधीने स्वाक्षरी केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी अवैध नियुक्तीकरिता कुलगुरु व प्र. कुलगुरु यांनी निर्देश दिल्याबाबत उपकुल सचिव यांनी इतिवृत्तात नमुद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अवैध निवडीबाबत मुप्ता संघटनेने तक्रार केली होती, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, अशाप्रकारे मुंबई विद्यापिठाअंतर्गत अपात्र व्यक्तींची प्राचार्य पदी नियुक्ती केल्याची ३९ प्रकरणे निदर्शनास आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या अवैध नियुक्तीबाबतची तक्रार करुनही याबाबतची कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही.

(२) शासन प्रतिनिधीने स्वाक्षरी केली नाही, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४) मुप्ता संघटनेने तक्रार केली होती, हे खरे आहे.

(५) हे खरे नाही.

(६) व (७) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील शैक्षणिक संस्थांच्या सभोवताली सिगारेट-तंबाखूची होत असलेली विक्री व सेवन**

**(३१) ४४४९० (२८-०४-२०१६). श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शाळा व महाविद्यालयांपासून १०० यार्डच्या परिसरात सिगारेट व तंबाखू विक्रीस बंदी असतानाही राज्यातील शैक्षणिक संस्थांच्या सभोवताली सिगारेट व तंबाखूची सर्रास विक्री व सेवन होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकाराची शासनाने चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्या काय आढळून आले आहे आणि सदरच्या प्रकारास आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१०-११-२०१६) :**(१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) शासनाच्या दिनांक ०७ जुलै, २०१५ च्या परिपत्रकान्वये शैक्षणिक संस्थेच्या १०० यार्ड परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विकण्यास बंदी असून याचे उल्लंघन करणा-यांवर कायद्यानुसार रु.२००/- पर्यंत दंड आकारण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) अनेक शाळाबाहय मुलांच्या तसेच बालमजुरी, बाल गुन्हेगारांच्या संख्येत झालेली वाढ**

**(३२) ४४६२५ (१२-०५-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत तालुक्यातील (जि.रायगड) अनेक शाळांमध्ये जरी कागदोपत्री शंभर टक्के पट नोंदणी दिसत असली तरी वास्तवात शाळाबाहय मुलांच्या तसेच बालमजूरी, बालगुन्हेगारांच्या संख्येत वाढच झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तालुक्यातील काही शाळांमध्ये अद्यापही या सोयी सवलतीपासून आदिवासी विद्यार्थी वंचित असल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-०७-२०१६) :**(१) व (२) नाही.
कर्जत तालुक्यात दिनांक ४ जुलै, २०१५ ते ३१ जानेवारी, २०१६ या कालावधीत वेळोवेळी केलेल्या सर्वेक्षणात १६८ शाहाबाह्य मुले आढळून आली त्यापैकी १३७ मुलांना नजीकच्या शाळेत दाखल करण्यात आले व उर्वरित ३१ मुले ही स्थलांतरी झाली. तसेच तालुक्यात स्थलांतरीत होऊन आलेल्या ३ मुलांना नजीकच्या शाळेत दाखल करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**डहाणू व पालघर तालुक्यात पदव्युत्तर शिक्षण देणारे महाविद्यालय नसल्याबाबत**

**(३३) ४५२४० (०५-०५-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील डहाणू व पालघर येथे पदव्युत्तर शिक्षण देणारे महाविद्यालय

नसल्याने विद्यार्थ्यांची क्षमता असूनही पदव्युत्तर शिक्षणापासून वंचित रहावे लागते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी दररोज २५ ते ३० कि.मी. प्रवास करुन अन्य जिल्हयात जावे लागते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, डहाणू येथे मेडिकल, अभियांत्रिकी, विधी, तंत्रशिक्षण यासारख्या शिक्षणक्रमांचे महाविद्यालय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) अंशत:खरे आहे.

(३) प्रत्येक जिल्हयात किमान एक तंत्र निकेतन महाविद्यालय धोरणानुसार पालघर जिल्हयातील विक्रमगड येथे शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालयाची स्थापना केलेली आहे व या तंत्रनिकेतनमधे ७० टक्के जागा स्थानिक पातळीवरील विद्यार्थ्यांसाठी राखीव आहे.

पालघर व डहाणू येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा कोणाताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन नाही. तथापि खाजगी संस्थेने वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव सादर केल्यास व आवश्यक त्या निकषांची पुर्तता करीत असल्यास आवश्यक ते प्रमाणपत्र देण्यासंदर्भात शासन स्तरावरुन निर्णय घेण्यात येतो.

पालघर जिल्हयात पदव्यूतर शिक्षणाची सोय उपलब्ध करुन देणारी महाविद्यालये आहेत. त्याचप्रमाणे मुंबई विद्यापीठाच्या सन २०१६-१७ च्या बृहत आराखडयानुसार पारंपारिक पदव्यूतर अभ्यासक्रम (विधीसह)मान्यतेचे प्रस्ताव विद्यापीठाकडून शासनास शिफारशीत झालेल्या पात्र प्रस्तावांना मान्यता देण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रामटेक (जि.नागपूर) येथील संस्कृत विद्यापीठाला कामठी विधानसभा क्षेत्रातील कालडोंगरी येथे दिलेली जमीन रद्द करण्याबाबत

**(३४) ४५५४९ (०५-०५-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामटेक (जि.नागपूर) येथील संस्कृत विद्यापीठाला कामठी विधानसभा क्षेत्रातील कालडोंगरी येथे दिलेली जमीन रद्द करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरेआहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०७-२०१६) :** (१) होय. लोकप्रतिनिधी श्री.डी.मल्लीकार्जुन रेड्डी, आमदार, रामटेक विधानसभा क्षेत्र यांनी दि. ११.१२.२०१५ रोजी कालडोंगरी येथे दिलेली जमीन रद्द करण्याबाबत मा.मुख्यमंत्री महोदयांना निवेदन दिले होते. तसेच श्री.मल्लीकार्जुन रेड्डी यांनी विधानसभा अधिवेशन डिसेंबर, २०१५ मध्ये लक्षवेधी सूचना क्र. ४७९५१ उपस्थित केली होती.
(२) सदर लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांनी विधानसभेत निवेदन देताना, कालडोंगरी येथे जनिमीची केलेली मागणी हा स्थानांतरणाचा भाग नसून आंतरराष्ट्रीय दर्जाचे अध्ययन, अध्यापन, संशोधन व पदव्युत्तर अभ्यासक्रम इ. शैक्षणिक विस्तारासाठी शासनाने उपलब्ध करुन दिली असल्याचे म्हटले आहे. तसेच मा.मुख्यमंत्री महोदयांनी यासंदर्भात संस्कृत विद्यापीठाचा विस्तार केला जाईल. तथापि, संस्कृत विद्यापीठाचे मुख्यालय रामटेक हेच असेल व त्याकरिता निधी उपलब्ध करुन दिला जाईल असे विधानसभेत आश्वासित केले होते व त्याअनुषंगाने रामटेक येथील संस्कृत विद्यापीठ मुख्यालय परिसराच्या भौतिक सुविधांकरिता डिसेंबर २०१५ च्या हिवाळी अधिवेशनात पुरवणी मागणीद्वारे निधी उपलब्ध करुन दिला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर शहरातील मुख्य प्रदेश द्वार असलेले जटपुरा गेट जवळ प्रचंड प्रमाणात वाहतूकीची कोंडी होत असल्यामुळे यावर उपाययोजना करण्याबाबत

**(३५) ४६४१७ (२७-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर शहरातील मुख्य प्रवेश द्वार असलेले जटपुरा गेट जवळ प्रचंड प्रमाणात वाहतूकीची कोंडी होत असल्यामुळे यावर उपाययोजना करण्यासाठी दिनांक ८ जानेवारी, २०१६ रोजी मा.पालकमंत्री जिल्हा चंद्रपूर, मा. जिल्हाधिकारी, महापौर महानगरपालिका चंद्रपूर, पुरातन विभागाचे अभियंता आणि स्थानिक लोकप्रतिनिधी चंद्रपूर यांनी सदर प्रवेश द्वारची पाहणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रवेशद्वारावर होणारी वाहतूक कोंडी दुर करण्यासाठी मा. पालकमंत्री चंद्रपूर जिल्हा यांनी पुरातत्व विभागाला उपाययोजना करण्यासाठी निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुरातत्व विभागाने यावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-०७-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) चंद्रपूर शहरातील मुख्य प्रवेशद्वारे असलेले जटपूरा गेट जवळ प्रचंड प्रमाणात वाहतुकीची कोंडी होत असल्यामुळे त्यावर उपाययोजना करण्यासाठी मा. पालकमंत्री चंद्रपूर यांनी दिलेल्या निदेशानुसार जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीस अनुसरुन जटपुरा गेटच्या बाजूला असलेल्या ऐतिहासिक भिंतीबाबत ६५ मीटर अंतरापर्यतची अधिसूचना रद्द

करण्याचे प्रस्ताव प्रादेशिक संचालक, पश्चिम विभाग भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई यांना जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी दिनांक २४.०२.२०१६ च्या पत्रान्वये सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्ह्यात फ्लोराईडग्रस्त गावांमध्ये उपाययोजना करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्याबाबत**

**(३६) ४६४२१ (२८-०४-२०१६). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **पाणीपुरवठा आणि स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात फ्लोराईड व नायट्रेडचे प्रमाण असलेल्या गावांची संख्या किती आहे व कपासू-१४१३/प्र.क्र.१२२/पापु-१३, दिनांक ७ मे, २०१५ अन्वये मा.पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांनी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यात किती डिफ्लोरीडेशन संयंत्र बसविण्यात आले आहे व कोणकोणत्या गावांमध्ये सयंत्र कार्यरत आहे,
(२) असल्यास, उक्त जिल्ह्यातील राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत सन २००५ पासून पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची गुणवत्ता वाढविण्यासाठी कोण-कोणती उपाययोजना करण्यात आली आहे व त्यामुळे पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता वाढली आहे काय,
(३) असल्यास, सदर योजना संपूर्ण जिल्ह्यात राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उक्त जिल्ह्यातील फ्लोराईडग्रस्त गांवात उपाययोजना करण्यासाठी विशेष मोहिम राबविण्यासंदर्भात कार्यक्रम आखण्यासाठी संबंधित विभागाला शासन निर्देश देणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बबनराव लोणीकर (०९-०६-२०१६) :** (१) सन २०१५ मध्ये राबविण्यत आलेल्या पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची रासायनिक तपासणी करण्यात आली असून, यात एकूण उपलब्ध १३३१० स्त्रोतापैकी ११२८० स्त्रोतांची रासायनिक तपासणी करण्यात आली. यात जिल्ह्यातील एकूण ३७२ गावांमध्ये ९५२ स्त्रोत फ्लोराईड बाधित व ७५८ गावांमध्ये ३७५५ स्त्रोत नायट्रेट या घटकाने बाधित असल्याचे तपासणीत आढळून आले.

चंद्रपूर जिल्ह्यात भारत निर्माण कक्षाद्वारे ४२ डिफ्लोरीडेशन संयंत्र व जिल्हा परिषदेद्वारे ३६ डिफ्लोरीडेशन संयंत्र बसविण्यात आले. या ७८ डिफ्लोरीडेशन बसविण्यता आलेल्या गावांपैकी ६५ गावांत नळ पाणीपुरवठा योजनेद्वारे पाणी पुरवठा सुरु असून उर्वरीत १३ गावांपैकी ०३ जलस्वराज्य कार्यक्रम-२, ०१ गाव सन २०१६-१७ च्या राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येत असून व ०१ गाव मा.मुख्यमंत्री पेयजल योजना सन २०१६-१७ मध्ये प्रस्तावित आहे. उर्वरित ८ बांधित गावांकरिता सन २०१६-१७ मध्ये नळ योजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या परंतु, जुन्याच योजना पूर्ण करण्याच्या सूचना असल्यामुळे ह्या योजना हाती घेण्यात आल्या नाही. प्राप्त झालेल्या सूचनेनुसार सादर

संयंत्राचा कंत्राटदारमार्फतचा देखभाल व दुरुस्तीचा कालावधी संपताच ग्रामपंचायतीद्वारे देखभाल व दुरुस्तीचा कालावधी संपताच ग्रामपंचायतीद्वारे देखभाल व दुरुस्ती सनियंत्रण न झाल्याने सदर संयंत्र बंद पडून सद्यस्थितीत कोणत्याही गावातील संयंत्र कार्यरत नाहीत.
(२), (३) व (४) चंद्रपूर जिल्ह्यात जलस्वराज्य प्रकल्प, भारत निर्माण कार्ग्रम व राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम योजने अंतर्गत गुणवत्ता बाधित गावात ४६२ नळ पाणी पुरवठा योजनेंची कामे पूर्ण करण्यात आली असून त्यामूळे पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता वाढली आहे. तसेच फ्लोराईडग्रस्त गावे/वाड्यातील नळयोजनांची कामे घेण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील १४ अभियांत्रिकी महाविद्यालयांना सन २०१४ ते २०१६ या वर्षासाठी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला बंदी घातल्याबाबत**

**(३७) ४७२४१ (०५-०५-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात अभियांत्रिकी अभ्यासक्रम चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक व भौतिक सुविधा नसल्याने व याबाबत दिशाभूल करणारी माहिती अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेला राज्यातील १४ खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांनी दिली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिशाभूल करणारी माहिती दिल्याच्या कारणावरुन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने सदर १४ अभियांत्रिकी महाविद्यालयांना सन २०१४ ते २०१६ या वर्षासाठी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाला बंदी घातली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बंदी उठविण्यासाठी संबंधित १४ महाविद्यालयांनी शासनावर दबाव आणल्याने प्रवेश बंदी उठविण्यासाठी राज्य शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष याचिका दाखल करण्याचा निर्णय अथवा तसा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शैक्षणिक सुविधा नसणाऱ्या व अवाच्यासव्वा शुल्क आकारणाऱ्या खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालयांची बाजू घेऊन सर्वोच्च न्यायालयाकडे विशेष याचिका दाखल करण्याचा प्रस्ताव शासनाने मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०६-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) नाही,

शैक्षणिक वर्ष २०१४-२०१५ व २०१५-१६ मध्ये सदर अभियांत्रिकी महाविद्यालयांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने मुदतवाढ न दिल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासाठी बंदी घालण्यात आली होती.

भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या आदेशाविरुध्द सदर महाविद्यालयांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल केल्या होत्या. मा.उच्च न्यायालयने दिलेल्या आदेशानुसार सदर महाविद्यालयांचा प्रवेश प्रक्रियेमध्ये समावेश करण्यात आला होता. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आल्या आहेत.

---

**रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील क्रीडा संकुलाच्या प्रलंबित बांधकामाबाबत**

**(३८) ४७४१० (०६-०५-२०१६). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील क्रीडा संकुलाचे बांधकामास शासनाने मंजुरी व निधी उपलब्ध करून दिला असतानाही अद्यापपर्यंत सदर क्रीडा संकुलाचे बांधकाम सुरु करण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) सदर क्रीडा संकुलाचे बांधकाम प्रलंबित असण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरील काम सुरु होण्यास किती कालावधी लागणे अपेक्षित आहे, तसेच सदर काम सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१७-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही. सदर संकुल बांधकामाकरिता टप्प्या-टप्प्याने रु. ९३.०० लक्ष अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. प्राप्त निधीतून तालूका क्रीडा संकुल, रेणापूर च्या जागेवर विविध खेळाची मैदाने व २०० मी धावनपथ तयार करणे याकरिता रु. १०.०० लक्ष खर्च करण्यात आलेला आहे तसेच संकुलाच्या संरक्षण भिंतीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे रु. २५.०० लक्ष वर्ग करण्यात आलेले आहेत.

(२) व (३) रेणापूर तालुका क्रीडा संकुलाच्या संरक्षण भिंतीच्या कामाचे मार्कआऊट करताना शेजारील शेतकऱ्यांनी आक्षेप घेतल्याने जागा मोजणे शक्य झाले नाही. सध्या संकुल समिती मार्फत भुमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी करुन घेण्याची कार्यवाही चालु असून भुमी अभिलेख कार्यालयामडेन सीमांकन करुन दिल्यानंतर कामाची सुरुवात करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शासनामार्फत चालविण्यात येणाऱ्या ग्रंथालयाबाबत व्यंकप्पा पत्की यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेली समिती**

**(३९) ४८४१८ (०५-०५-२०१६). श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनामार्फत चालविण्यात येणाऱ्या ग्रंथालयाबाबत व्यंकप्पा पत्की यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने त्यांच्या अहवालात कोणकोणत्या शिफारशी केल्या आहेत,

(३) तसेच सदर शिफारशींची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१६) :** (१) होय.
(२) व्यंकप्पा पत्की समितीने सादर केलेल्या अहवालात महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालये अधिनियम व त्या अनुषंगाने तयार करण्यात आलेले विविध नियम यामध्ये सुधारणा करण्याबाबत शिफारस केली आहे. तसेच शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांमधील कर्मचा-यांसाठी वेतनश्रेणी, सेवाशर्ती आणि सेवानियम याबाबत ही शिफारशी केल्या आहेत.
(३) राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयातील सेवक हे शासकीय कर्मचारी नसल्याने त्यांना वेतनश्रेणी व सेवाशर्ती लागू करणे शक्य नाही, तथापि, ग्रंथालय सेवकांच्या सेवाविषयक बाबीमध्ये एकसूत्रता येण्याकरीता सेवाविषयक सवलती व सुविधांविषयी मार्गदर्शक तत्त्वे/सूचना ग्रंथालय संचालनालयाच्या दिनांक ८.५.२०१३ च्या पत्रिपत्रकान्वये निश्चित करण्यात आल्या आहेत.

मा.व्यंकप्पा पत्की समितीने केलेल्या शिफारशीपैकी बहुतांश शिफारशी पूर्ण केल्या आहेत.

१. प्रत्येक जिल्ह्यात शासकीय जिल्हा ग्रंथालय स्थापन करण्यात आलेली आहेत.
२. शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांचया परिरक्षण अनुदानात शासनाने वेळोवेळी वाढ केलेली आहे.
३. प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी डिजिटल उपकेंद्र स्थापन करण्याबाबत कार्यवाही सुरु आहे.
४. जिल्हा/विभाग/राज्य ग्रंथालय संघ यांच्या अनुदानात वाढ करण्यात आलेली आहे.
५. संशोधन संस्था अनुदानात वाढ करण्यात आलेली आहे.
६. राज्य ग्रंथालय परिषदेची स्थापना करण्यात येत आहे. ग्रंथालयांना देण्यात येणा-या परिरक्षण अनुदानात वेळोवेळी वाढ केलेली आहे. दि.२१.०२.२०१२ पासून परिरक्षण अनुदानात केलेली ५०% वाढ नियमानुसार देण्यात येत आहे.

ग्रंथालयांना त्यांच्या खात्यात परिरक्षण अनुदान ऑनलाईन देण्यात येत आहे.

राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांना निधीच्या उपलब्धतेनुसार देय असलेले अनुदान देण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती अंतर्गत असलेल्या शारिरीक शिक्षण विभागात विद्यार्थ्यांकडून अनधिकृतपणे दंड वसूल केला जात असल्याबाबत**

**(४०) ४८६०१ (०५-०५-२०१६). श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती अंतर्गत असलेल्या शारिरीक शिक्षण विभागात विद्यार्थ्यांकडून अनधिकृतपणे दंड वसूल करुन विद्यार्थ्यांचा आर्थिक छळ केल्याप्रकरणी दिनांक १ फेब्रुवारी, २०१६ रोजी विद्यार्थ्यांनी उपोषणाचा मार्ग पत्करला, हे खरे आहे काय,

(२) सदर प्रकरणी विदयापीठाच्या कुलगुरुंनी चौकशी समिती नेमली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, तद्नुसार चौकशीत काय आढळून आले आहे, तसेच संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१५-०७-२०१६) :** (१) होय.
(२) होय.
(३) प्राथमिक चौकशीच्या अहवालानुसार डॉ.बेहरा यांना दि.०५/०२/२०१६ पासून निलंबित करण्यात आले व विभागीय चौकशी करण्याकरीता चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या "बी.ए." च्या जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या या शिक्षणक्रमाच्या विद्यार्थ्यांना अदयाप अध्ययन पुस्तकेच मिळाली नसल्याबाबत**

**(४१) ४८६९४ (०५-०५-२०१६). श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या "बी.ए." च्या जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या या शिक्षणक्रमाच्या मुंबई केंद्रातील अनेक विद्यार्थ्यांना अध्ययन पुस्तकेच मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अभ्यास केंद्राने अद्याप लेक्चरही सुरु केलेले नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अध्ययन पुस्तकेच मिळाली नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची भिती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०७-२०१६) :** (१) हे खरे नाही. विद्यापीठाकडून प्राप्त माहितीनुसार विद्यार्थ्यांचा प्रवेश कालावधी दि.१२ जून, २०१५ ते दि.३० सप्टेंबर, २०१५ होता. मुंबई विभागात एकूण प्रवेशित विद्यार्थी २७४ असून दि.०९ ऑक्टोबर, २०१५ ते १२ ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत अभ्यासकेंद्रनिहाय या विद्यार्थ्यांना पुस्तके पाठविण्यात आलेली आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही

---

**राज्यातील विद्यापीठांचे विकेंद्रीकरण्यासाठी शासनाने नेमलेली समिती**

**(४२) ४८७३७ (२६-०५-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विद्यापीठांचे विकेंद्रीकरण (उपकेंद्रे स्थापन) करण्याविषयी शासनास शिफारशी करण्याकरिता शासनाने समिती नेमलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त समितीची रचना, कार्यकक्षा व कालावधी काय आहे,

(३) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, अहवालाचे स्वरुप काय आहे व त्यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०७-२०१६) :** (१) होय. राज्यातील विद्यापीठांच्या विकेंद्रीकरणाकरता डॉ. राम ताकवले यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक २३.१०.२०१० अन्वये एक समिती गठित करण्यात आली होती.

(२) व (३) डॉ. ताकवले समितीने ५ ऑगस्ट, २०११ रोजी त्यांचा अहवाल शासनास सादर केला आहे. सदर समितीने सादर केलेल्या अहवालामध्ये उपकेंद्रांकरता निश्चित करायची पदे तसेच उपकेंद्राकरता येणारा एकूण खर्च या बाबी अधिक स्पष्ट करण्याकरता डॉ. योगानंद काळे यांच्या अध्यक्षतेखाली शासन निर्णय दिनांक २८.०४.२०१५ अन्वये एका समितीची स्थापना करण्यात आली आहे. डॉ. काळे समितीने त्यांचा अहवाल शासनास दिनांक २३.०२.२०१६ रोजी सादर केला असून शिफारशीच्या अनुषंगाने सादर केलेला प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मराठवाड्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयातील आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची रक्कम परत करण्याबाबत**

**(४३) ४८९३६ (०५-०५-२०१६). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाड्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेताना आर्थिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील २० हजार विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी भरलेली संपूर्ण फी मधील निम्मी रक्कम त्यांना परत मिळते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विद्यार्थ्यांना गेल्या दोन वर्षापासून सन २०१४-१५ व सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षाची शासनाकडून शैक्षणिक शुल्क परत मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची रक्कम परत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०५-०७-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) शैक्षणिक वर्ष २०१४-१५ ची प्रतिपूर्ती देण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०१५-१६ करीता शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेचा शासन निर्णय दिनांक ३१/३/२०१६ रोजी निर्गमित करण्यात आला आहे. त्यानुसार प्रतिपूर्तीची रक्कम वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली, सिंदेवाही येथील क्रीडा संकूलनाच्या विकासासाठी प्रत्येकी ३ कोटी रूपये निधी देण्याबाबत**

**(४४) ४९५१५ (०६-०५-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील बल्लारपूर, चंद्रपूर यासह काही तालुक्यातील क्रीडा संकूलनाच्या विविध विकासकामासाठी विशेष बाब अंतर्गत यावर्षी प्रत्येकी किमान तीन कोटी रुपये निधी देण्यात आलेला आहे, परंतू त्याच चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही येथील क्रीडा संकूलनाच्या विकासासाठी सदर निधी अद्यापही देण्यात आलेला नसल्याचे दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही येथील क्रीडा संकूलनातील विविध विकासकामे निधी अभावी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही येथील क्रीडा संकूलनातील विविध विकासकामे करण्यासाठी प्रत्येकी ३ कोटी रूपये निधी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. विनोद तावडे (१२-०७-२०१६) :**(१) होय, अंशतः खरे आहे.
(२) व (३) ब्रम्हपूरी, सावली व सिंदेवाही येथील क्रीडा संकुलांना शासन निर्णय दिनांक २६.०३.२००९ नुसार रु.१००.०० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे. राज्यातील विभागीय, जिल्हा व तालुका क्रीडा संकुलांच्या बांधकामाबाबत सुधारित कार्यपध्दती विहित करण्यासाठी शासन निर्णय दि.०२.०९.२०१५ अन्वये राज्यस्तर समिती स्थापन करण्यात आलेली हैाती. सदर समितीने क्रीडा संकुलामध्ये क्रीडा सुविधा त्वरीत पूर्ण करणे, बांधकामास होणारा विलंब, अपु-या सुविधा पुर्ण करण्यासाठी शासन निर्णयात निर्देशित बाबनिहाय रक्कम व DSR रेटच्या अनुषंगाने झालेली वाढ, स्थानिक प्रचलित खेळांनुसार क्रीडा सुविधा निर्मिती बाबतचा बृहत् आराखडा तयार करणे, क्रीडा संकुलांसाठी केअर टेकर नियुक्ती करणे, विभागाच्या ठिकाणी जिल्हा क्रीडा संकुलांची बांधकामे करणे इ.बाबींचा अभ्यास करुन सदर समितीचा अहवाल शासनास सादर केला आहे. उपरोक्त अहवालामध्ये क्रीडा संकुलांच्या अनुदान मर्यादेत वाढ करण्यासाठी बाब अंतभूत असून सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा, राजूरा, सावली व जिवती तालुक्यांमधील पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची आधारकार्ड नोंदणीची कामे तातडीने करण्याबाबत

**(४५) ५०१६६ (१२-०५-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरोरा, राजूरा, सावली व जिवती तालुक्यातील (जि.चंद्रपूर) पहिली ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची आधारकार्ड नोंदणी अपूर्ण असल्यामुळे गटशिक्षणाधिकारी यांची एक वेतनवाढ थांबविण्याचे आदेश दिनांक २० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार कारवाई केली आहे काय,

(३) तसेच विद्यार्थ्यांची आधारकार्ड नोंदणीचे काम तातडीने पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०७-२०१६) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

संबंधित गटशिक्षणाधिकारी यांची एक वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या स्वरुपात रोखण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) चंद्रपूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढण्याचे काम ९०.१६% झाले असून उर्वरित विद्यार्थ्यांचे आधारकार्ड काढण्यासाठी शाळानिहाय अतिरिक्त मशिन उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## तुमसर व मोहाडी तालुका (जि.भंडारा) येथे शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयास मंजुरी मिळणेबाबत

**(४६) ५०४९६ (०५-०५-२०१६). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तुमसर व मोहाडी तालुका (जि.भंडारा) येथे शासकीय तंत्रनिकेतन विद्यालय सुरु करणेबाबत दिनांक २० जुलै, २०१५ रोजी मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना विनंती केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास शासनाने यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-०७-२०१६) :**(१) होय. तुमसर, ता. तुमसर (जि.भंडारा) येथे शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय (महिला) स्थापन करणेबाबत शासनास निवेदन प्राप्त झालेले आहे.

(२) याबाबत तंत्रनिकेतन सुरु करता येईल किंवा कसे यासंदर्भात सविस्तर शहानिशा करुन अहवाल सादर करण्याचे तंत्रशिक्षण संचालनालयास कळविण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील शारिरीक शिक्षण महाविद्यालये ही राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्याचा घेतलेला निर्णय

**(४७) ५०८०१ (०५-०५-२०१६). श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शारिरीक शिक्षण महाविद्यालये ही राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय राज्य शासनाने दिनांक १३ फेब्रुवारी, २०१४ रोजी घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विभाग हस्तांतरण होवूनही अद्यापपर्यंत शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सेवा शर्तीचे नियम लागु करण्यात आलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू महाविद्यालये विद्यापीठांशी संलग्न असतांना या महाविद्यालयांना शालेय शिक्षण विभागाचे नियम लागू करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, यासंदर्भातील असमानता तातडीने दुर करुन शारिरीक शिक्षण महाविद्यालयांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे नियम लागू करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करीत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१४-०७-२०१६) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने दि.२४.११.२०११ च्या शासन निर्णयान्वये ६ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सुधारित वेतन संरचना लागू करताना अध्यापक पदासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेली वेतनश्रेणी व ॲकॅडेमिक ग्रेडपे मंजूर केला असल्याचे दिसून येते, परंतु सदर अध्यापकांना विद्यापीठ अनुदान विहीत केलेली शैक्षणिक अर्हता, पात्रता, अर्हता अनुभव इ. बाबी तसेच करिअर ॲडव्हान्स्मेंट स्कीमअंतर्गत अनुज्ञेय असलेले लाभ लागू केले नसल्याने दिसून येते. त्यामुळे सद्य:स्थितीत कार्यरत अध्यापकांना क्रीडा विभागाच्या नियमावलीनुसारच सेवाशर्तीचे नियम लागू आहेत.

(४) संचालक, उच्च शिक्षण यांना यासंदर्भात सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे दि.१६ जून, २०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यातील सहा तालुक्यात क्रीडा संकुल नसल्याबाबत

**(४८) ५२६५८ (०६-०५-२०१६). श्री.जयदत्त क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील सहा तालुक्यात क्रीडा संकुलाचे काम अद्याप मंजूर करण्यात आलेले नसून उर्वरित तालुक्यातील मंजूर असलेली कामे वर्षानुवर्षे रखडलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीड जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालयातील रिक्त पदे, प्रमुख अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे अनेक विकास कामे प्रलंबित राहत असून बऱ्याचदा निधीही वापराविना तसाच पडून राहत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हयातील तालुका क्रीडा संकुलाच्या कामाचा आढावा घेवून मंजूर कामे तात्काळ सुरु करुन उर्वरित सहा तालुक्यात नवीन क्रीडा संकुल मंजूर करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, तालुकास्तरीय क्रीडा संकुलाची मंजूर कामे विहीत मुदतीत पूर्ण होत नसल्याबाबत तसेच विकास निधी अखर्चित राहिल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द शासन कोणती कार्यवाही करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-०७-२०१६) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) बीड जिल्हयातील ११ तालुक्यांपैकी ८ तालुक्यांमध्ये क्रीडा संकुलासाठी जागा उपलब्ध झालेली असून त्यासाठी निधी वितरीत करण्यात आलेला आहे. यापैकी ३ तालुका क्रीडा संकुलाच्या बांधकामांना प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर जागांची अडचण, न्यायालयीन प्रकरणे इत्यादीमुळे कामे बंद पडलेली आहेत. तर ३ क्रीडा संकुलासाठी अद्याप जागा उपलब्ध होवू शकलेली नाही. सदर ३ क्रीडा संकुलासाठी जागा प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मराठी भाषा भवनाची धोबी तलाव येथील नियोजित जागा बदलून वाद्रे-कुर्ला संकुल येथे बांधण्याचा घेतलेला निर्णय

**(४९) ५२७०२ (०६-०५-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने मराठीच्या संशोधन आणि संवर्धनासाठी धोबी तलाव येथील रंगभवनच्या परिसरात अद्ययावत मराठी भाषा भवन उभारण्याचा निर्णय बदलून प्रस्तावित भाषा भवन वाद्रे-कुर्ला संकुल (BKC) येथे बांधण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात भाषा भवन इमारतीच्या प्रकल्पासाठी एकूण किती रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे,

(३) असल्यास, उक्त मराठी भाषा भवन किती कालावधीत बांधुन पूर्ण होणे अपेक्षित आहे,

(४) असल्यास, सदरचे बांधकाम विहित कालावधीत पुर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (११-०७-२०१६) :** (१) नाही.

(२) रंगभवन, धोबी तलाव या जागेवर मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्राच्या (मराठी भाषा भवन) बांधकामाच्या कामासाठी सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षासाठी १.०० कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आली आहे.

(३) अद्यापि निश्चित कालावधी ठरविण्यात आलेला नाही.

(४) व (५) रंगभवन येथील जागेवर मराठी भाषा संशोधन, विकास व सांस्कृतिक केंद्राच्या (मराठी भाषा भवन) बांधकामाच्या परवानगीबाबत वारसा हक्क जपणूक (हेरिटेज) समितीचा आक्षेप दूर करण्याच्या दृष्टीने नगर विकास विभागाकडून तपासणी करण्यात येत आहे.

---

**राज्यात अभियांत्रिकी शिक्षण संस्थेकडून पदवी घेतलेल्या राज्यातील ३२ टक्के विद्यार्थ्यांनपैकी पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या अवघ्या ९ टक्के अणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या १३ टक्केच विद्यार्थ्यांना रोजगार मिळाल्याबाबत**

**(५०) ५४०९८ (२२-०८-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अभियांत्रिकी शिक्षण संस्थेकडून पदवी घेतलेल्या राज्यातील ३२ टक्के विद्यार्थ्यांपैकी पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या अवघ्या ९ टक्के अणि पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या १३ टक्केच विद्यार्थ्यांना रोजगार मिळाल्याचे माहे मे,२०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थी रोजगारक्षम नसल्याची टिका कंपन्यांकडून होत असून तसेच राज्यात तंत्रशिक्षणातील ढासलेली गुणवत्ता आणि बेसुमार वाढलेल्या अभियांत्रिकी पदवी आणि पदवीके सोबतच पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचे शिक्षण धोक्यात आल्याने तसेच अभियांत्रिकीच्या हजारो जागा रिक्त असल्याने येत्या शैक्षणिक वर्षात अनेक अभियांत्रिकी पदवी आणि पदविका महाविद्यालये बंद होण्याची शक्यता निर्माण झाली आहे हे ही खरे आहे काय,आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील अभियांत्रिकी अभ्यासक्रमांचा दर्जा, विद्यार्थांची रोजगार क्षमतेबाबत सदरील शिक्षण संस्थेची चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार विद्यार्थी रोजगारक्षम बनविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-१०-२०१६) :**(१) निदर्शनात आलेले नाही.

(२) अंशत: खरे आहे.

(३) पदवी अभ्यासक्रम हे विद्यापीठामार्फत तर पदविका अभ्यासक्रम महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांच्यामार्फत तयार करण्यात येतात. सबब, पदवी व पदविका अभ्यासक्रमांमध्ये कालानुरुप बदल करण्याची तसेच अभ्यासक्रमाचा दर्जा राखण्याबाबतची कार्यवाही विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या स्तरावर करण्यात येते.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.